PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Paradh
Year: 1977

Song: Kaik Maifili Alya Gelya
Lyricist:

कैक मैफिली आल्या गेल्या
अशी न आली संधी
हरणीकडूनी आज शिकारी
होईल गं जायबंदी
नेम धरून डावा डोळा मिटला
बाण सुटला डोळा मिटला
हे बाण सुटला नजर बाण सुटला
बाण सुटला नजर बाण सुटला

एवढया गर्दीत एकली उभी
घडीघडीला करते खुबी
गं बाई घडीघडीला करते खुबी
त्याची उतरून घेतली छबी
तुला करता इशारा पटला
बाण सुटला डोळा मिटला
हे बाण सुटला नजर बाण सुटला
बाण सुटला नजर बाण सुटला
ज्यानी सुसाट पिसाट झाली

नाच नाचूनी दंगा घाली
नाच नाचूनी दंगा घाली
ठिणग्या उधळीन मी वर खाली
बघता बघता कसा धीर सुटला
बाण सुटला डोळा मिटला
हे बाण सुटला नजर बाण सुटला
बाण सुटला नजर बाण सुटला

ह्यो इश्काचा जालीम फटका
इथं चांदण्याचा बसतोय चटका
इथं चांदण्याचा बसतोय चटका
बेताबेतानं घ्यावा जरा घुटका
जो उठला त्यो जलमातून उठला
बाण सुटला डोळा मिटला
हे बाण सुटला नजर बाण सुटला
बाण सुटला नजर बाण सुटला
बाण सुटला नजर बाण सुटला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*